## गोपनीय

क्रमांक : का.स./बैठक/२२५

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,**
**वांद्रे-कुर्ला समूह, वांद्रे (पूर्व),**
**मुंबई - ४०० ०५१.**

दिनांक : ७ नोव्हेंबर, २००८.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १६ ऑक्टोबर, २००८ (गुरुवार) रोजी झालेल्या २२५ व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

प्रा/स/ ८/११/२००८
**सचिव,**
**कार्यकारी समिती**

**प्रति :**

मुख्य सचिव,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२. - अध्यक्ष

श्री.द.म.सुकथनकर,
"प्रिया", वरळी सी फेस, वरळी,
मुंबई - ४०० ०१८. - सदस्य

श्री.एन्.व्ही.मिराणी
ए/४७, आदर्श नगर,
वरळी, मुंबई - ४०० ०२५ - सदस्य

डॉ.शिरीष संख्ये
संचालक,
मॅकन्सी अँड कंपनी, एक्सप्रेस टॉवर,
२१ वा मजला, नरिमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२१ - सदस्य

प्रधान सचिव,
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२. - सदस्य

महापालिका आयुक्त, - सदस्य
बृहन्मुंबई महानगरपालिका,
<u>मुंबई - ४०० ००१.</u>

सचिव, - सदस्य
गृहनिर्माण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
<u>मुंबई - ४०० ०३२.</u>

व्यवस्थापकीय संचालक - सदस्य
सिडको,
निर्मल, नरीमन पॉईंट,
<u>मुंबई - ४०० ०२३.</u>

महानगर आयुक्त - सदस्य
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण.

**<u>निमंत्रित</u>** :

सचिव,
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
<u>मुंबई - ४०० ०३२.</u>

प्रधान सचिव (उद्योग),
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
<u>मुंबई - ४०० ०३२.</u>

सचिव,
पर्यावरण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
<u>मुंबई - ४०० ०३२.</u>

सचिव (विशेष प्रकल्प),
सामान्य प्रशासन विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
<u>मुंबई - ४०० ०३२.</u>

**<u>प्रत अग्रेषित :-</u>**

विधी सल्लागार, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण.
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधिकारी

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या २२५ व्या बैठकीचे कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | १६ ऑक्टोबर, २००८ (गुरुवार) |
| वेळ | : | संध्याकाळी ५.०० वाजता |
| सभास्थान | : | मा.मुख्य सचिव यांचे समिती कक्ष,<br>५ वा मजला, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. |

उपस्थित सदस्य :

| | | |
|---|---|---|
| श्री.जॉनी जोसेफ<br>मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन | - | अध्यक्ष |
| श्री.द.म.सुकथनकर | - | सदस्य |
| श्री.एन्.व्ही.मिराणी | - | सदस्य |
| श्री.टी.सी.बेंजामिन<br>प्रधान सचिव,<br>नगर विकास विभाग,<br>महाराष्ट्र शासन | - | सदस्य |
| डॉ.ज.मो.फाटक<br>महापालिका आयुक्त,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | - | सदस्य |
| श्री.जी.एस.गील<br>व्यवस्थापकीय संचालक,<br>सिडको | - | सदस्य |
| श्री.सीताराम कुंटे<br>सचिव,<br>गृहनिर्माण विभाग,<br>महाराष्ट्र शासन | - | सदस्य |

श्री.रत्नाकर गायकवाड - सदस्य
महानगर आयुक्त

**निमंत्रित :**

श्री.ए.एम.खान
प्रधान सचिव (उद्योग)
उद्योग, उर्जा व कामगार विभाग
महाराष्ट्र शासन

श्री.मनु कुमार श्रीवास्तव
सचिव, नगर विकास विभाग,
व सचिव (वि.प्र.)
सामान्य प्रशासन विभाग (अतिरिक्त कार्यभार)
महाराष्ट्र शासन

श्री.मिलिंद म्हैसकर
अतिरिक्त महानगर आयुक्त / प्रकल्प संचालक,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्रीमती अश्विनी भिडे
सह महानगर आयुक्त
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.के.एन.पटेल
विधी सल्लागार
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

डॉ.सतीश बागल
वित्त सल्लागार,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.पी.आर.के.मुर्ती
प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.यु.व्ही.लुकतुके
प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

कु.उमा अड्सुमिली
प्रमुख, नियोजन विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.श्री.र.नंदर्गीकर
मुख्य अभियंता,
अभियांत्रिकी विभाग
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. सु.मो.रामचंदानी
मुख्य अभियंता,
अभियांत्रिकी विभाग
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.दिलीप कवठकर
सह प्रकल्प संचालक (जनसंपर्क)
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.प्र.सि.तायडे
सचिव, कार्यकारी समिती,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

बैठकीच्या सुरुवातीस, मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी कार्यकारी समितीचे नवीन तज्ञ सदस्य श्री.एन्.व्ही.मिराणी यांचे स्वागत केले. तसेच त्यांनी कार्यकारी समितीचे माजी सदस्य श्री.र.य.तांबे व श्री.हरिशंकरन् हयांनी कार्यकारी समितीचे सदस्य म्हणून बजावलेल्या बहुमोल सेवेचा गौरवपूर्ण उल्लेख केला.

कार्यकारी समितीचे सदस्य श्री.द.म.सुकथनकर यांनी असे सांगितले की, कार्यकारी समितीच्या सदस्यांना बैठक शुल्क म्हणून रु.३००/- सन २००१ पासून प्रति बैठक दिले जात आहे. त्या शुल्कामध्ये वाढ करण्याची गरज असल्याचे त्यांनी निदर्शनास आणले. यासंदर्भात महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, कार्यकारी समितीच्या सदस्यांचे बैठक शुल्क रु.३०००/- प्रति बैठक मंजूर करण्यात येईल व त्यानुसार संबंधित सदस्यांना अदा करण्याची कार्यवाही पुढील बैठकीपासून करण्यात येईल.

त्यानंतर, विषयपत्रिकेवरील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या.

...४/-

**बाब क्र.१ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ३० मे, २००८ रोजी झालेल्या २२४ व्या बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**बाब क्र.२ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ३० मे, २००८ रोजी झालेल्या २२४ व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

कार्यवाही अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**बाब क्र.३ : मुंबई महानगर प्रदेशांतर्गत विविध रेल्वे स्थानकांच्या परिसरात २२ स्कायवॉक बांधकामांच्या निविदांना मान्यता मिळणेबाबत.**

३.१ महानगर आयुक्तांनी यासंदर्भात थोडक्यात माहिती देऊन असे स्पष्ट केले की, मुंबईतील रेल्वे स्थानकांच्या परिसरात रेल्वेने येणारे प्रवासी, बस, टॅक्सी, खाजगी वाहने इ. मुळे रेल्वे स्थानकांच्या आजुबाजुच्या परिसरात मोठया प्रमाणात गर्दी होते. तसेच फेरीवाल्यांकडून झालेली अतिक्रमणे, वाहनतळ यामुळे प्रवाशांना स्थानकांच्या परिसरात जाणे व स्थानकांमधून बाहेर पडणे अडचणीचे ठरत असून घाईगर्दीच्या वेळेस ते अधिकच त्रासदायक होते. त्यामुळे प्रवाशांना रेल्वे स्थानकांच्या परिसरातून थेट बाहेर पडणे सुलभ व जलद व्हावे यासाठी प्राधिकरणाने मुंबई महानगर प्रदेशातील विविध रेल्वे स्थानकांच्या परिसरात स्कायवॉक बांधण्याचा प्रकल्प हाती घेतला आहे. या प्रकल्पांतर्गत एकूण ५४ स्कायवॉक बांधण्याचे नियोजन आहे. या प्रकल्पाचा एकूण अंदाजित खर्च रुपये ६०० कोटी इतका असून प्राधिकरणाच्या दिनांक २८.९.२००७ रोजी झालेल्या ११९ व्या बैठकीत त्यास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. यापैकी रु.१० कोटी पेक्षा जास्त किंमतीच्या खालील उल्लेखिलेल्या २२ स्कायवॉकसाठी बांधकामाच्या निविदांच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. | वांद्रे (पश्चिम) | ९. | ठाणे (पूर्व) | १६. | भाईंदर (पूर्व) |
| २. | अंधेरी (पूर्व) | १०. | मुलुंड (पूर्व) | १७. | कुर्ला (पश्चिम) |
| ३. | सांताक्रुझ (पूर्व) | ११. | मीरा रोड (पूर्व) | १८. | दादर (पूर्व) भाग-२ |
| ४. | दहिसर (पश्चिम) | १२. | भाईंदर (पश्चिम) | १९. | दादर (पूर्व) भाग-३ |
| ५. | उल्हासनगर (पूर्व) | १३. | घाटकोपर (पश्चिम) | २०. | दहिसर (पूर्व) |
| ६. | उल्हासनगर (पश्चिम) | १४. | मुलुंड (पश्चिम) | २१. | सांताक्रुझ (पश्चिम) |
| ७. | भांडूप (पश्चिम) | १५. | बदलापूर (पूर्व) | २२. | बोरीवली (पश्चिम) |
| ८. | कुर्ला (पूर्व) | | | | |

३.२ महानगर आयुक्त यांनी परिच्छेद क्र.-२,३,४,५,६,७ व ८ बाबत सविस्तर माहिती दिली. महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, सर्व बाबींचे अवलोकन करता परिच्छेद क्र.-८ मधील विवेचनानुसार २२ विविध ठिकाणांच्या स्कायवॉकच्या बांधकामासाठी खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे शिफारस केलेले सर्व लघुत्तम निविदाकारांचे कमी केलेले अंतिम सुधारीत देकार निविदेतील सर्व अटींचे अनुपालन करणारे तसेच सुसंवादी व रास्त असल्यामुळे ते कार्यकारी समितीच्या मान्यतेकरीता सादर करण्यात आले होते.

३.३ श्री.द.म.सुकथनकर व श्री.सीताराम कुंटे, सदस्य, कार्यकारी समिती यांनी अशी सूचना केली की, स्कायवॉक बांधण्याचा उद्देश हा पादचा-यांच्या उपयोगीतेसाठी आहे. त्यामुळे तेथे अन्न शिजवणारे तसेच भाजीपालावाले आणि नाशिवंत पदार्थ विकण्या-या दुकानदारांना परवानगी देऊ नये तसेच या उन्नत पादचारी मार्गावर केवळ Convenient Shops ना परवानगी देण्यात यावी. अंधेरी येथील स्कायवॉकवर दुकानांकरिता दोन मजल्यांचे बांधकाम करण्याऐवजी केवळ एक मजल्याच्या स्कायवॉकचा विचार करावा.

३.४ श्री.एन.व्ही.मिराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी अशी सूचना केली की, स्कायवॉकवर फेरीवाल्यांसाठी आणि दुकानदारांसाठी तरतूद करण्यात येत असेल तर चालण्याच्या पातळीच्या थोडी वर दुकानांची पातळी ठेवण्यात यावी. तसेच त्यांनी दुसरी सूचना अशी केली की, मुख्य अभियंता पेक्षा कमी दर्जा नसलेला एक बाहेरील तज्ञ, निविदा समिती आणि अर्हतापूर्व समितीमध्ये यापुढील कामासाठी घेण्यात यावा. स्कायवॉक बांधावयाचे अंदाजपत्रक तयार करताना उच्च दर ज्यांनी दिलेला आहे त्याची कारणे लक्षात घेण्यात यावीत. तसेच चेंगराचेंगरी टाळण्यासाठी आपत्कालीन सुटका करुन घेण्याकरीता निकासमार्ग विकसित करण्यात यावेत.

३.५ महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, स्कायवॉकवर बांधण्यात येणा-या दुकानांसाठी शासनाने अगोदरच विकास नियंत्रण नियमावलीत बदल केला असून सदस्यांच्या सूचना लक्षात घेता प्रथम कांजुरमार्ग स्कायवॉकवर प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्यात येईल व तो अनुभव लक्षात घेवूनच इतर स्कायवॉकमध्ये प्रकल्पग्रस्तांचे / फेरीवाल्यांचे पुनर्वसन करण्यात येईल. डॉ.जयराज फाटक यांनीही या प्रस्तावास पुष्टी दिली.

३.६ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र. ११०७ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे खालील निविदाकारांच्या लघुत्तम निविदा स्विकारण्यास करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे.

| अ.क्र | स्कायवॉकचे ठिकाण | निविदाकाराचे नाव | अंदाजपत्रकीय किंमत | लघुत्तम देकार | देकाराची रक्कम (रुपये लाखात) |
|---|---|---|---|---|---|
| १. | वांद्रे (पश्चिम) | मे.जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि. | १८४७ | २९.७०% जास्त | २३९५.९० |
| २. | अंधेरी (पूर्व) | मे.जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि. | २३१० | २९.७०% जास्त | ३०००.६९ |
| ३. | सांताक्रुझ (पूर्व) | मे.अजयदीप आर.पी.एस. (भागीदारी संस्था) | २२५० | २९.९०% जास्त | २९२२.७५ |
| ४. | दहिसर (पश्चिम) | मे.इस्टकोस्ट कन्स्ट्रक्शन्स इंडिया एलएन (भागीदारी संस्था) | १७९४ | २५% | २२४२.५० |
| ५. | उल्हासनगर (पूर्व) | मे.पी.बी.ए. कन्स्ट्रक्शन | १२२८ | २८.७५% जास्त | १५८१.०५ |
| ६. | उल्हासनगर (पश्चिम) | मे.पी.बी.ए. कन्स्ट्रक्शन | २२६६ | २८.७५% जास्त | २९१७.४७ |
| ७. | भांडूप (पश्चिम) | मे.आर.के. मधानी एण्ड कंपनी | १२१५ | २८.७०% जास्त | १५६३.७० |
| ८. | कुर्ला (पूर्व) | मे.वालेचा इंजिनिअरिंग लि. | १२०७ | १०% जास्त | १३२७.७० |
| ९. | ठाणे (पूर्व) | मे.एन.सी.सी. - एस.एम.सी. (भागिदारी संस्था) | ३१३५ | २९.७०% जास्त | ४०६६.०९ |
| १०. | मुलुंड (पूर्व) | मे.जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि. | २२६१ | २१.९०%जास्त | २७५६.१६ |
| ११. | मीरा रोड (पूर्व) | मे.जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि. | १७०८ | २४.९०% जास्त | २१३३.२९ |
| १२. | भाईंदर (पश्चिम) | मे.जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि. | १७७५ | २४.७०% | २२१३.४२ |
| १३. | घाटकोपर (पश्चिम) | मे.आर.के. मधानी एण्ड कंपनी | १०७४ | २९.७०% जास्त | १३९२.९८ |
| १४. | मुलुंड (पश्चिम) | मे.रामकी इन्फ्रास्ट्रक्चर्स | ४६३० | १७.६५% जास्त | ५४४७.२० |
| १५. | बदलापूर (पूर्व) | मे.जिवाणी आणि डोलचंद (भागीदारी संस्था) | ९५३ | १४.२५% जास्त | १०८८.८० |
| १६. | भाईंदर (पूर्व) | मे.धनश्री डेव्हलपर्स प्रा.लि. | १९२८ | ११.००% जास्त | २१४०.०८ |
| १७. | कुर्ला (पश्चिम) | मे.वालेचा इंजिनिअरिंग लि. | १८७३ | २९.८०% जास्त | २४३१.१५ |
| १८. | दादर (पूर्व) भाग-२ | मे.जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि. | १६६५ | २८.८९% जास्त | २१४६.०२ |

...७/-

| अ.क्र | स्कायवॉकचे ठिकाण | निविदाकाराचे नाव | अंदाजपत्रकीय किंमत | लघुत्तम देकार | देकाराची रक्कम (रुपये लाखात) |
|---|---|---|---|---|---|
| १९. | दादर (पूर्व) भाग-३ | मे.जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि. | १६४५ | २८.८९% जास्त | २१२०.२४ |
| २०. | दहिसर (पूर्व) | मे.धनश्री डेव्हलपर्स प्रा.लि. | १३०२ | ११.००% जास्त | १४४५.२२ |
| २१. | सांताक्रूझ (पश्चिम) | मे.एस.व्ही.जिवानी व दोलचंद (भागीदारी संस्था) | २२२१ | १५.६०% जास्त | २५६७.४८ |
| २२. | बोरीवली (पश्चिम) | मे.धनश्री डेव्हलपर्स प्रा.लि. | ३०४० | ११.००% जास्त | ३३७४.४० |

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** सभेच्या कार्यवृत्ताच्या मंजुरीच्या प्रतिक्षेशिवाय निविदेनुसार आवश्यक असणा-या कागदपत्रांची पूर्तता करणे आदींसाठी महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

"**आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांच्या शुल्कामध्ये करावी लागणारी अनुषंगिक वाढ नियमित करण्यासाठी महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. "

**बाब क्र.४ : वांद्रे-कुर्ला संकुलामधील "जी", "जी-टेक्स्ट" व "जीएन" ब्लॉक येथील रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करण्याचे कामासाठी प्रशासकीय मान्यता व निविदेस मंजूरी मिळणेबाबत.**

या विषयावर विचारविमर्श करण्याचे लांबणीवर टाकण्यात आले.

**बाब क्र.५ : मुंबई महानगर प्रदेशात मोनो रेल व्यवस्था : प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूकीस मान्यता देणेबाबत.**

महानगर आयुक्त यांनी प्रस्तावाबाबत माहिती देताना असे सांगितले की, मोनो रेल प्रकल्पाची देखरेख करण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची निवड करण्यासाठी दिनांक ९ एप्रिल, २००८ रोजी जागतिक स्तरावर निविदा मागविण्यात आल्या होत्या, या निविदांस प्रतिसाद म्हणून ६ निविदाकारांनी निविदा खरेदी केल्या. त्यापैकी २ निविदाकारांनी आपले तांत्रिक व आर्थिक प्रस्ताव दिनांक २ जून, २००८ रोजी सादर केले. त्या निविदाकारांची नावे खालीलप्रमाणे –

(१) सोईल लिमिटेड + क्रिग कंपनी लि., चायना (China Railway Eryuan Engineering Group Co.Ltd., China) + टिम वन आर्किटेक्ट्स इंडिया प्रा. लिमिटेड (Team One Architects India Pvt.Ltd.)

२) लुईस बर्जर ग्रुप (Louis Berger Group) + ए.ई.आय.बी. (Architectural & Engineering Innovations Bureau)

५.२ निविदाकारांनी सादर केलेल्या तांत्रिक प्रस्ताव आणि आर्थिक प्रस्ताव यांचे मूल्यमापन करुन एकत्रित गुण केल्यानंतर त्यांना प्राधान्य क्रमांक देण्यात आले.

५.३ मे.सोईल लिमिटेड (Sowil Ltd.) + क्रिग कंपनी लि. चायना (China Railway Eryuan Engineering Group Co.Ltd. China) + टिम वन आर्किटेक्टस् इंडिया प्रा.लि. (Team One Architects India Pvt. Ltd.) या समुहाने सदर कामासाठी रु.३५,५२,३६,९००/- + सेवा कर या रकमेचा देकार सादर केला आहे. मे. सोईल लिमिटेड (Sowil Ltd.) + क्रिग कंपनी लि. चायना (China Railway Eryuan Engineering Group Co.Ltd. China) + टिम वन आर्किटेक्टस् इंडिया प्रा.लि. (Team One Architects India Pvt. Ltd.) या समुहाने सादर केलेला देकार प्रकल्पाच्या अंदाजित खर्चाच्या २.३७% इतका आहे.

५.४ त्यानंतर या प्रस्तावावरील सविस्तर चर्चेमध्ये श्री.एन.व्ही.मिराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी अशी सूचना केली की, सुरुवातीस जादा देयकाचे अधिदान होऊ नये म्हणून अधिदानाच्या अनुसूचीचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. तसेच जर मध्यंतरीच्या कालावधीमध्ये बांधकाम बंद झाले किंवा स्थगीत करण्यात आले तर त्यावर उपाय म्हणून नुकसानभरपाईची तरतूद करण्यात यावी. भविष्यामध्ये बाहेरील तज्ञ जो मुख्य अभियंताच्यापेक्षा खालच्या दर्जाचा नसावा अशा तज्ञाची नेमणूक मूल्यमापन समितीवर करण्यात यावी.

५.५ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.११०८</u> :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि

त्याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे

१) सोईल लिमिटेड (Sowil Ltd) + क्रिग कंपनी लि. चायना (China Railway Eryuan Engineering Group Co.Ltd. China) + टिम वन आर्किटेक्टस् इंडिया प्रा.लि. (Team One Architects India Pvt. Ltd.) या समुहाची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून रु.३५,५२,३६,९००/- + सेवा कर एवढया फी वर नेमणूक करण्यास मान्यता देत आहे.

२) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण नजिकच्या काळात मुंबई महानगर प्रदेशामध्ये मोनोरेल प्रकल्प राबविणार असल्यामुळे मे.सोईल लिमिटेड (Sowil Ltd.) + क्रिग कंपनी लि. चायना (China Railway Eryuan Engineering Group Co.Ltd. China) + टिम वन आर्किटेक्टस् इंडिया प्रा.लि. (Team One Architects India Pvt. Ltd.) आणि लुईस बर्जर ग्रुप (Louis Berger Group) + ए.ई.आय.बी. (Architectural & Engineering Innovations Bureau) यांच्या नावाची अंतिम यादी करुन मोनोरेल प्रकल्पाच्या भविष्यातील मार्गांसाठी वरील दोन्ही सल्लागारांकडून फक्त आर्थिक प्रस्ताव मागविण्यास मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.६ : मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत मुलुंड चेकनाका ते सायन पूर्व द्रुतगती महामार्गाचे रुंदीकरण व सुधारणा करणे या कामावरील अस्तित्वातील प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांना मुदतवाढ देणे व वाढीव फी मंजूर करणे.**

या विषयावर विचारविमर्श करण्याचे लांबणीवर टाकण्यात आले.

**बाब क्र.७ : प्राधिकरणाकडील असलेला अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवाल - दिनांक १ एप्रिल, २००८ ते दिनांक ३० सप्टेंबर, २००८.**

या विषयावर विचारविमर्श करण्याचे लांबणीवर टाकण्यात आले.

**बाब क्र.८ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाद्वारे राबविण्यात येत असलेल्या विविध प्रकल्पांची माहिती सर्व सामान्य नागरिक व प्रकल्पग्रस्तांपर्यंत प्रभावीरित्या पोहचविण्याकरीता जनसंपर्क सल्लागार संस्थेच्या नियुक्तीस कार्योत्तर मंजूरी मिळण्याबाबत.**

या विषयावर विचारविमर्श करण्याचे लांबणीवर टाकण्यात आले.

**बाब क्र.९ : दक्षिण मुंबईतील स्कायवॉकच्या बांधकामासाठी आंतरराष्ट्रीय सल्लागारांची नेमणूक करण्याबाबत.**

या विषयावर विचारविमर्श करण्याचे लांबणीवर टाकण्यात आले.

**बाब क्र.१० : मे.इंडियन रजिस्टार ऑफ शिपिंग यांची स्कायवॉकच्या बांधकामासाठी तांत्रिक तपासणी सल्लागार (प्रुफ चेकींग कन्सलटंट) म्हणून नेमणूकीसाठी मान्यता मिळणेबाबत.**

महानगर आयुक्तांनी यासंदर्भात थोडक्यात माहिती देऊन असे स्पष्ट केले की, मुंबईतील रेल्वे मधून प्रवास करणा-या प्रवाशांना स्टेशनच्या परिसरातील अरुंद रस्त्यावरुन जाणा-या बस, टॅक्सी खाजगी वाहने इ.च्या वाहतूकीमुळे मोठया अडथळयांना तोंड द्यावे लागते. त्यांतच मध्येच फेरीवाल्यांकडून झालेली अतिक्रमणे, वाहनतळ यामुळे प्रवाशांना स्टेशनवरुन बाहेर पडणे व स्टेशनात प्रवेश करणे घाईगदीच्या वेळेस त्रासदायक होते. यासाठी प्राधिकरणाने मुंबई महानगर प्रदेशातील गर्दीच्या रेल्वे स्टेशनवरुन थेट बाहेर पडण्यासाठी, स्टेशनच्या परिसरात स्कायवॉकच्या बांधणीची कामे हाती घेण्याचे नियोजन केले आहे. स्कायवॉकमुळे रेल्वेतून येणा-या प्रवाशांना या गर्दीतून जावे न लागता वरचेवर स्टेशनमधून मोकळया मार्गाने बाहेर येऊन मोक्याच्या ठिकाणी उतरणे शक्य होणार आहे.

१०.२ मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मुंबई शहरात व उपनगरात रेल्वे स्टेशनच्या परिसरात एकुण ५४ स्कायवॉक बांधण्याचे नियोजन केले आहे. एकूण ५४ स्कायवॉक प्राथमिक अंदाजित खर्च रुपये ६०० कोटी इतका असून प्राधिकरणाच्या दिनांक २८ सप्टेंबर, २००७ रोजी झालेल्या ११९ व्या बैठकीत प्राधिकरणाने त्यास प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. नियोजित ५४ स्कायवॉकपैकी बांद्रा (पूर्व) येथील स्कायवॉकचे बांधकाम प्राधिकरणामार्फत पूर्ण करण्यात आले असून उर्वरित ५३ स्कायवॉकचे बांधकाम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्यामार्फत करण्यात येणार आहे. ५३ पैकी १४ स्कायवॉकचे बांधकाम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचेकडे सोपविण्यात आले आहे व २६ स्कायवॉकच्या बांधकामासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने निविदा मागविल्या आहेत.

१०.३ या संदर्भात श्री.एन.व्ही.मिराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी अशी सूचना केली की, गुणनियंत्रणाची लेखापरिक्षणे, स्थळपाहणीची वारंवारता आणि दराच्या कक्षा ठरविण्यात याव्यात. जे मनुष्यबळ ते उपलब्ध करुन देणार आहेत त्यांची शैक्षणिक पात्रता व त्या क्षेत्रातील त्यांच्या अनुभवाचा तपशील त्यांनी उपलब्ध करुन द्यावा. सदर आय आर एस संस्थेबरोबर कंत्राट करताना अहवालाची पध्दत त्यांनी केलेल्या तांत्रिक बाबींची पूर्तता इत्यादी बाबी करारात अंतर्भूत कराव्यात. तसेच मनुष्यबळ किती असावे याबाबत तपशील कंत्राटात अंतर्भूत असावा. तसेच सनियंत्रणाची पध्दती ठरविण्यात यावी. गुणनियंत्रण लेखापरिक्षणाचे अहवालाबाबत प्रतिकुल शेरे असतील ते विशेषतः अतिरिक्त महानगर आयुक्त यांच्या स्तरावर पहाण्यात यावे. ज्या ठिकाणी मुख्य अभियंता या शे-याबदद्ल किंवा या पूर्ततेबाबत सहमत नाही अशा शे-याबाबत अतिरिक्त महानगर आयुक्त यांच्या स्तरावर पाहणी करण्यात यावी. बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये गुणनियंत्रण लेखापरिक्षण हे सध्या दक्षता विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आले आहे. त्यानुसार स्वतंत्र यंत्रणा निर्मितीचा विचारही करण्यात यावा.

१०.४ महानगर आयुक्त यांनी बाब टिप्पणीच्या परिच्छेद क्र. २ मध्ये स्कायवाक बांधावयाचे नियोजन केले आहे त्याबाबत थोडक्यात माहिती दिली. प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी सांगितले की, कार्यकारी समितीला विनंती करण्यात येत आहे की, मे.इंडियन रजिस्टर ऑफ शिपिंग यांना स्कायवॉकच्या कामासाठी प्रुफ चेकिंग सल्लागार म्हणून, निविदा किंमतीच्या ०.३९९९%

या दराने नेमण्यास मान्यता देण्यात यावी. तसेच त्यांच्या सदरच्या कामासाठी रु.६५००/- प्रति भेट या दराने स्वतंत्रपणे कामाचा दर्जा, वेल्डींग, गंजविरोधक उपाय इत्यादीबद्दल सल्ला देण्यासाठी नेमण्यास मान्यता देण्यात यावी.

१०.५ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र. ११०९ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (दोन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि त्याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मे.इंडियन रजिस्टर ऑफ शिपिंग यांना प्रुफ चेकिंग सल्लागार म्हणून स्कायवॉकच्या कामासाठी, निविदा किंमतीच्या ०.३९९९% या दराने नेमण्यास मान्यता देत आहे. तसेच त्यांच्या प्रत्येक कामाच्या भेटीसाठी रु.६५००/- प्रति भेट या दराने स्वतंत्रपणे कामाचा दर्जा, वेल्डींग, गंजविरोधक उपाय इत्यादीबद्दल सल्ला देण्याच्या कामासाठी नेमण्यास, करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह, मंजूरी देण्यात येत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** सभेच्या कार्यवृत्ताच्या मंजुरीच्या प्रतिक्षेशिवाय निविदेनुसार आवश्यक असणा-या कागदपत्रांची पुर्तता करणे आदींसाठी महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.११ : वांद्रे (पूर्व) येथील स्कायवॉक वरील जाहिरातींचे हक्क देणेच्या बदल्यात दोन उद्वाहन, शौचालय वगैरे बसविणे व त्यांचेसह संपूर्ण स्कायवॉकची देखभाल, दुरुस्ती व व्यवस्थापन करणेची निविदा मंजूरीबाबत.**

या विषयावर विचारविमर्श करण्याचे लांबणीवर टाकण्यात आले.

**बाब क्र.१२ : मुंबई महानगर प्रदेशात मोनो रेल व्यवस्था : मे.राईट्स लिमिटेड या सल्लागार संस्थेस कामाची व्याप्ती वाढवून ठाणे-भिवंडी-कल्याण या छन्नमार्गाचा सुसाध्यता अभ्यास करण्यासाठी कार्योत्तर मंजूरी देणेबाबत.**

या विषयावर विचारविमर्श करण्याचे लांबणीवर टाकण्यात आले.

**बाब क्र.१३ : मोनोरेल प्रकल्पाचा बृहत आराखडा तयार करण्यासाठी मे.ली असोसिएट्स यांची सल्लागार म्हणून नेमणूक करणेबाबत.**

या विषयावर विचारविमर्श करण्याचे लांबणीवर टाकण्यात आले.

**बाब क्र.१४ : मुंबई महानगर प्रदेशात मोनोरेल व्यवस्था : संत गाडगे महाराज चौक - वडाळा - चेंबूर या मार्गावर मे.लार्सन अँड टुब्रो आणि स्कोमी इंजिनियरिंग या समुहामार्फत प्रकल्प राबविण्याच्या निविदेस मंजूरी देणेबाबत.**

महानगर आयुक्तांनी यासंदर्भात थोडक्यात माहिती देऊन पार्श्वभूमी आणि सद्यस्थिती खालीलप्रमाणे सांगितली :-

१४.२ मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक २८ सप्टेंबर, २००७ रोजी झालेल्या ११९ व्या बैठकीत २५ कि.मी. लांबीचा मोनोरेल प्रकल्प प्रायोगिक तत्वावर सुरु करण्यासाठी आणि सदर प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरिता रु.१५०० कोटी इतक्या अंदाजित खर्चास तत्वतः मान्यता दिली. तसेच मोनोरेल प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक असलेल्या सल्लागाराच्या नेमणूकीसाठी प्राधिकरणाने मान्यता दिली होती. त्यानुसार मे.राईट्स या सल्लागाराची तांत्रिक व वित्तीय सुसाध्यता अभ्यास अहवाल आणि निविदा प्रक्रियेस सहाय्य करण्याकरीता नियुक्ती करण्यास कार्यकारी समितीच्या २२३ व्या बैठकीत कार्योत्तर मंजूरी देण्यात आली.

१४.३ मे.राईटस् या सल्लागाराने यापूर्वी अतिरिक्त मुख्य सचिव, नगर विकास विभाग यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या तज्ञ समितीने शिफारस केलेल्या चार मार्गिकांचे विश्लेषण करुन संत गाडगे महाराज चौक (जेकब सर्कल) ते वडाळा - वडाळा ते चेंबूर स्थानक या २ मार्गिकांवर प्रकल्प

राबविण्यासाठी शिफारस केलेली आहे. त्याप्रमाणे त्यांनी तांत्रिक व वित्तीय सुसाध्यता अभ्यास अहवाल तयार करुन आणि भारतात प्रथमतः अंमलबाजवणी होत असल्यामुळे या दोन्ही मार्गरेषांना Turn Key प्रकल्प म्हणून प्रायोगिक तत्वावर राबविण्याची शिफारस केली आहे. त्याचा कार्यकारी वृत्तांत सोबत जोडण्यात आला आहे.

१४.४ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, मोनोरेल प्रकल्पाची अंमलबजावणी करताना देखरेख करण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची निवड करण्यासाठी दिनांक ९ एप्रिल, २००८ रोजी जागतिक स्तरावर जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आल्या. या जाहिरातीस प्रतिसाद म्हणून ६ निविदाकारांनी निविदा खरेदी केल्या. त्यापैकी २ निविदाकारांनी आपले प्रस्ताव सादर केले. त्या निविदाकारांची नांवे खालीलप्रमाणे :–

(१) मे.सोईल लिमिटेड (Sowil Limited) + क्रिग कंपनी लि. चायना (China Railway Eryuan Engineering Group Co.Ltd. China) + टिम वन आर्किटेक्टस् इंडिया प्रा.लि. (Team One Architects India Pvt. Ltd.)

(२) लुईस बर्जर ग्रुप (Louis Berger Group) + ए.ई.आय.बी. (Architectural & Engineering Innovations Bureau) + कन्सल्टींग इंजिनिअरींग सर्व्हिसेस, मित्र सदस्य (Consulting Engineering Services, Associate Members)

१४.५ मोनोरेल प्रकल्प राबविण्यास प्राधिकरणाने दिलेल्या मान्यतेनुसार मोनोरेल प्रकल्प राबविण्यासाठी दिनांक १२ नोव्हेंबर, २००७ रोजी जाहिरातीद्वारे जागतिक स्तरावर निविदा मागविण्यात आल्या. या जाहिरातीस प्रतिसाद म्हणून २० (वीस) निविदाकारांनी अर्हता प्राप्त दस्तऐवज खरेदी केले आणि त्यापैकी ७ (सात) निविदाकारांनी अर्हता प्राप्त दस्तऐवज प्राधिकरणास सादर केले. त्यापैकी खालील तीन उल्लेखित निविदाकार अर्हताप्राप्त असल्याचे दिसून आले. त्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत :–

(१) बम्बार्डियर ट्रान्सपोर्टेशन इंडिया लि. कॅनडा
(Bombardier Transportation India Ltd.)

(२) रिलायन्स एनर्जी लिमिटेड आणि हिताची लिमिटेड
(Reliance Energy Ltd. & Hitachi)

(३) लार्सन आणि टुब्रो इंडिया आणि स्कोमी इंजिनिअरिंग बीएचडी
(Larsen & Toubro Limited India and Scomi Engineering Bhd.)

१४.६ बम्बार्डियर ट्रान्सपोर्टेशन इंडिया लि. कॅनडा या निविदाकारांनी विनंती प्रस्ताव खरेदी केला नाही. परिच्छेद क्र. २ बाबत महानगर आयुक्त यांनी अशी माहिती दिली की, या बाबींमध्ये महत्वाचे फेरबदल झाले किंवा नाही यावर, मे. राईटस् यांनी दिलेल्या तांत्रिक अहवालावर मुल्यमापन समितीने चर्चा केली आणि यावर महानगर आयुक्त यांची मान्यता घेतल्यानंतर विधी सल्लागारांचा अभिप्राय घेण्यात आला. विधी सल्लागार यांनी दिलेल्या सल्ल्यानुसार रिलायन्स एनर्जी लिमिटेड आणि हिताची लिमिटेड या समूहांना विसंवादी ठरविण्यात आले. त्याप्रमाणे त्यांची अनामत रक्कम व आर्थिक देकार न उघडता साभार परत करण्यात आले.

१४.७ परिच्छेद क्र.३ मधील माहितीसुध्दा महानगर आयुक्तांनी सांगितली. मे.राईटसूने दिलेल्या तांत्रिक प्रस्तावावर मे.लार्सन आणि टुब्रो इंडिया आणि स्कोमी इंजिनिअरिंग बीएचडी (Larsen & Toubro Limited India and Scomi Engineering Bhd.) या समूहाकडून स्पष्टीकरण मागविण्यात आले.

१४.८ त्यांची पाहणी केल्यानंतर दिनांक १२ ऑगस्ट, २००८ रोजी त्यांचे आर्थिक प्रस्ताव उघडण्यात आले. त्यांचे प्रस्ताव खालीलप्रमाणे आहेत –

| अनु क्र. | तपशील | किंमत |
|---|---|---|
| १. | मे. लार्सन आणि टुब्रो इंडिया आणि स्कोमी इंजिनिअरिंग बीएचडी (Larsen & Toubro Limited India and Scomi Engineering Bhd.) या समुहाने सादर केलेली बांधकाम किंमत<br><br>मार्ग पहिला - संत गाडगे महाराज चौक ते वडाळा डेपो आणि वडाळा येथे दोन्ही मार्गिकांसाठी डेपो<br><br>मार्ग दुसरा - वडाळा डेपो ते चेंबूर स्थानक | रु.२,९७० कोटी. सर्व करांसहित<br><br>रु.१७८२ कोटी<br><br>रु. ११८८ कोटी |
| २. | **कार्य आणि देखभाल खर्च**<br>**(Opreation and maintainance Cost)**<br>प्रथम वर्ष<br>व्दितीय वर्ष<br>तृतीय वर्ष | <br><br>रु.४८,४४,२८,०००/-<br>रु.५९,१५,८४,७००/-<br>रु.७१,६०,६४,३००/- |

१४.९ परिच्छेद क्र.७ बद्दल महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मे. लार्सन आणि टुब्रो इंडिया आणि स्कोमी इंजिनिअरिंग बीएचडी (Larsen & Toubro Limited India and Scomi Engineering Bhd.) यांनी रु.२,४६० कोटी किंमतीचा अंतिम देकार दिनांक ७ ऑक्टोबर, २००८ रोजीच्या पत्रान्वये सादर केला. सदर देकार हा त्यांच्या पूर्वीच्या देकारापेक्षा रु.२५४ कोटींनी कमी आहे. दिनांक ७ ऑक्टोबर, २००८ च्या पत्रान्वये निविदाकाराने वाढीव दराबद्दल दिलेली कारणे खालीलप्रमाणे आहेत :–

१. आपण दिलेल्या निविदा दस्तऐवजानुसार फक्त सिमेंट आणि स्टीलकरीता वाढीव किंमत देण्यात आलेली आहे. प्रकल्पासाठी वापरण्यात येणा-या इतर साधनसामुग्रीसाठी वाढीव किंमत देण्यात आलेली नाही.

२. प्रकल्पाच्या बांधकामासाठी लागणा-या निधीसाठी घ्यावयाच्या कर्जावरील व्याज विचारात घेतले आहे.

३. मोनोरेल प्रकल्पाच्या कास्टींग यार्डसाठी लागणा-या जमिनीचे भाडे सुमारे रु.१५ कोटी इतके विचारात घेतले आहे.

४. या प्रकल्पाच्या मार्गरेषेपैकी ३२% पेक्षा जास्त मार्गरेषा वक्राकार असून वक्राकार मार्गासाठी लागणा-या वर्तुळखंडासाठी (segment) लागणारा जास्तीचा खर्च विचारात घेतला आहे.

५. Integration & Commissioning - प्रकल्प पूर्णपणे Turn Key basis वर आधारित असून प्रकल्पाची सखोल रचना आणि प्रकल्प राबविण्याची जबाबदारी निविदाकारावर आहे. त्यांच्यावर बरीच जबाबदारी असून त्यात अंतर्भूत असलेल्या वेगवेगळया जबाबदा-या निविदाकाराने विचारात घेतल्या आहेत.

१४.१० महानगर आयुक्त यांनी सदर प्रकल्पाची सविस्तर माहिती दिल्यानंतर प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग यांनी मोनोरेल प्रकल्पाचे सविस्तर सादरीकरण (Power Point) कार्यकारी समितीसमोर केले.

१४.११ श्री.एन.व्ही.मिराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी अशी सूचना केली की, सदरहू प्रकल्प हा एकमेव वित्तीय निविदेवर आधारीत असल्यामुळे आपण त्यांच्या योग्यतेचे मुल्यमापन करताना ते काळजीपूर्वक केले पाहिजे आणि हा प्रकल्प देशातील पहिला प्रकल्प असल्यामुळे याबाबत दुसरे अभिप्राय प्राप्त केले पाहिजे. त्यांची दुसरी सूचना अशी आहे की, शिवडीपर्यंत या मार्गाचा विस्तार

...१७/-

करण्यात यावा आणि या संरेखनाचे पुर्नसमायोजन करुन असा एकत्रित मुंबई पार बंदर जोड रस्ता पूर्ण करण्यात यावा. त्यांनी तिसरी सूचना अशी मांडली की, मे. राईटस्ने आपल्या अहवालामध्ये प्रतिकुल मुद्दे उपस्थित केलेले आहेत. त्याकरीता पर्यावरण आघाताचे मुल्यमापन करण्यात यावे. त्यांची चौथी सूचना अशी आहे की, प्रस्तावीत स्थानकांकडील विकीरण व्यवस्थापनाचे परिक्षण करण्यात यावे.

१४.१२ मा.मुख्य सचिव, यांनी अशी विचारणा केली की, मोनोरेल प्रकल्पासाठी केंद्र सरकारच्या पर्यावरण मंत्रालय तसेच वन मंत्रालयाची ना हरकत दाखला मिळविण्याची आवश्यकता आहे काय? त्याबाबत महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, केंद्र सरकारच्या पर्यावरण मंत्रालय तसेच वन मंत्रालयाची नाहरकत दाखला मिळविण्याची आवश्यकता नाही, परंतू प्रकल्पाचा IEE मे. राईटस्मार्फत करण्यात आला आहे आणि कंत्राटदाराने संरक्षण, आरोग्य आणि पर्यावरण समतोल राखण्यासंदर्भात योग्य त्या उपाययोजना करण्यासंबंधातील बाबींचा उल्लेख निविदामध्ये केला आहे. त्यानंतर श्री.द.म.सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी अशी विचारणा केली की, मोनोरेल प्रकल्पामुळे ध्वनी प्रदुषण किती वाढणार आहे. त्यावर महानगर आयुक्त यांनी असे उत्तर दिले की, मोनोरेलसाठी रबरी चाकांचा वापर होत असल्यामुळे ध्वनी प्रदुषणामध्ये फारशी वाढ होण्याची शक्यता नाही.

१४.१३ मा. मुख्य सचिव यांनी अशी सूचना केली की, तीन वर्षानंतरच्या कालावधीसाठी मोनोरेल प्रकल्पाची कार्यप्रणाली व देखभाल कशाप्रकारे करण्यात यावी, याबाबतचा विचार करण्यात यावा. यावर महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, तीन वर्षानंतरच्या कालावधीसाठी मोनोरेल प्रकल्पाची कार्यप्रणाली व देखभाल बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि दळणवळण (BEST) यांनी करण्यास सहमती दर्शविली आहे.

१४.१४ निविदा मूल्यमापन समितीने निविदाकाराने सादर केलेल्या अंतिम आर्थिक प्रस्तावावर दिनांक १४ ऑक्टोबर, २००८ रोजी चर्चा केली. निविदा मूल्यमापन समितीने या मार्गरेषेवर असलेले अरुंद रस्ते आणि इतर अडचणी लक्षात घेता या मार्गरेषेवर दुसरा पर्याय म्हणजे बस जलद परिवहन व्यवस्था, मेट्रो रेल किंवा लाईट रेल व्यवस्थेची अंमलबजावणी करणे तांत्रिकदृष्टया अत्यंत अडचणीचे आहे, असे सुचविले आहे. निविदा मूल्यमापन समितीने अहवालात असेही म्हटले आहे की, हा प्रकल्प अंमलबजावणी करण्यासाठी येणा-या खर्चात जर राज्य शासन आणि केंद्र शासनाने करामध्ये सूट दिल्यास प्रकल्पासाठी होणारा खर्च कमी होईल.

१४.१५ यावर महानगर आयुक्त यांच्या आदेशाप्रमाणे Independent Cost Assessment साठी नेमणूक केलेल्या मे.लुईस बर्जर ग्रुप (Louis Berger Group) यांस लार्सन ॲन्ड टुब्रो आणि स्कोमी इंजिनिअरिंग बीएचडी यांनी दिनांक ७ ऑक्टोबर, २००८ च्या पत्रानुसार दिलेल्या अंतिम निविदेचा देकार रास्त आहे अथवा नाही हे तपासून त्यांचे मत देण्याकरीता सांगण्यात आले. त्यानुसार मे.लुईस बर्जर ग्रुप (Louis Berger Group) यांनी त्यांचे दिनांक १४ ऑक्टोबर, २००८ च्या पत्रान्वये निविदाकाराने दिलेली सर्व कारणे तसेच बांधकामाच्या संदर्भात मुंबईत असलेली विशिष्ट परिस्थिती लक्षात घेता निविदाकार मे.लार्सन आणि टुब्रो इंडिया आणि स्कोमी इंजिनिअरिंग बीएचडी (Larsen & Toubro Limited India and Scomi Engineering Bhd.) या समुहाने दिलेला अंतिम देकार विचार करण्यास योग्य आहे असे मत दिले आहे.

१४.१६ श्री. सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी असे निदर्शनास आणले की, मे. राईटस् यांच्या अहवालानुसार स्थानक क्षेत्र आवश्यकतेपेक्षा जास्त आहे. तसेच पारमार्गासाठी (Viaduct) निविदाकाराने दिलेला खर्च जास्त वाटतो. त्यासंदर्भात असे स्पष्टीकरण देण्यात आले आहे की, निविदाकाराने सादर केलेल्या प्रस्तावानुसार स्थानके दोन पातळयांमध्ये असून सर्व साधनसामुग्री, कार्यप्रणालीच्या सुविधा, इत्यादी Mezzanine मजल्यामधील concourse मजल्यावर प्रस्तावित आहे, जे NFPA १३० ला प्रमाणित केले आहे. मे. राईटस् यांनी सर्व साधनसामुग्री, कार्यप्रणालीच्या सुविधा, इत्यादी Platform वर प्रस्तावित केले आहे, जे NFPA १३० ला प्रमाणित नाही. म्हणून स्थानक क्षेत्र जास्त आहे. निविदाकाराशी तडजोड केल्यानंतर, निविदाकाराने प्रकल्पाची मुळ किंमत रु. २५४ कोटींनी कमी केली आहे.

१४.१७ कार्यकारी समितीच्या सर्व सदस्यांच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा करुन मे.लार्सन आणि टुब्रो इंडिया आणि स्कोमी इंजिनिअरिंग बीएचडी (Larsen & Toubro Limited India and Scomi Engineering Bhd.) या समुहामार्फत संत गाडगे महाराज चौक - वडाळा - चेंबूर या मार्गावर मोनोरेल प्रकल्प राबविण्यासाठीच्या रु.२,४६० कोटी अधिक कर एवढया किंमतीच्या आर्थिक निविदेस कार्यकारी समितीने मंजूरी दिली.

१४.१८ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.१११०</u> :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मे.लार्सन आणि टुब्रो इंडिया आणि स्कोमी इंजिनिअरिंग बीएचडी (Larsen & Toubro Limited India and Scomi Engineering Bhd.) या समुहामार्फत संत गाडगे महाराज चौक - वडाळा - चेंबूर या मार्गावर मोनोरेल प्रकल्प राबविण्यासाठी रु.२४६० कोटी अधिक कर एवढया किंमतीच्या आर्थिक निविदेस मान्यता देण्यात येत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** हा प्रकल्प अंमलबजावणी करण्यासाठी येणा-या खर्चात जर राज्य शासन आणि केंद्र शासनाने करामध्ये सूट दिल्यास प्रकल्पासाठी होणारा खर्च कमी होणार असल्यामुळे सदर प्रकरणी पाठपुरावा करण्याचे अधिकार महानगर आयुक्त यांना प्रदान करण्यात येत आहेत.

"**आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र.१५</u> : <u>मुंबई नागरी पायाभुत सुविधा प्रकल्पांतर्गत डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्ग पॅकेज क्र.१ अंतर्गत किंग्ज सर्कल उड्डाणपूल व तुळपुळे चौक उड्डाणपूलाचे एकत्रिकरण करणे व त्या अनुषंगाने येणा-या अधिक खर्चास मंजूरी देणेबाबत.</u>**

या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत ४१ उड्डाणपूल प्रस्तावित असून डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्गावर खालील उड्डाणपूलांचा समावेश आहे.

१. सायन हॉस्पीटल उड्डाणपूल,

२. किंग्ज सर्कल उड्डाणपूल,
३. तुळपुळे चौक उड्डाणपूल,
४. हिंदमाता जंक्शन उड्डाणपूल,
५. भारतमाता - लालबाग जंक्शन उड्डाणपूल,

कार्यकारी समितीच्या दिनांक २५ जुलै, २००६ रोजीच्या २१७ व्या बैठकीमध्ये सदर उड्डाणपूलांना रु.९७.५९ कोटीची मान्यता देण्यात आली आहे. २००७ पर्यंत सदर उड्डाणपूलाचे काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडे देण्यात आले होते. सदर उड्डाणपूलांच्या कामाच्या निविदासुध्दा मागविण्यात आल्या होत्या. परंतु, काही कारणांमुळे निविदेवर प्रक्रिया करण्यात आली नाही व प्रकल्प कार्यान्वित होऊ शकला नाही. ऑगस्ट, २००७ मध्ये सदर प्रकल्प मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने करावयाचे असे ठरले. त्यानंतर सदर पूलांच्या कामाकरिता श्री.एस.एन.भोबे आणि असोसिएट्स यांची प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

१५.२ श्री.एन.व्ही.मिराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी अशी सूचना केली की, किंग्जसर्कल आणि तुळपुळे उड्डाणपूल यांचे एकत्रिकरण करण्याच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता तत्वतः देण्यास हरकत नसावी. या अतिरिक्त खर्चाचे मूल्यमापन करुन कार्यकारी समितीपुढे सादर करण्यात यावे. प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग यांनी यावर असे स्पष्टीकरण दिले की, या अतिरिक्त खर्चाचे स्वतंत्रपणे अंदाजपत्रक तयार करुन त्यास सक्षम प्राधिका-याकडून तांत्रिक मान्यता दिल्यानंतर स्वीकृत केलेल्या निविदेतील (Variation clause) प्रमाणे कंत्राटदारास अधिदान देण्यापूर्वी सक्षम प्राधिका-याची मंजूरी घेण्यात येईल.

१५.३ बाब टिप्पणीच्या परिच्छेद क्र.- २ व ३ बद्दल महानगर आयुक्त यांनी थोडक्यात माहिती दिली. त्यानंतर, या प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी सर्वांनी सहभाग घेतल्यानंतर असे ठरले की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्गावरील पॅकेज क्र.१ मधील किंग्ज सर्कल व तुळपुळे चौक उड्डाणपूलांचे एकत्रिकरण करण्यास व तद्अनुषंगाने होणा-या रु.३० कोटी अधिक खर्च व त्यामुळे रु.१४२ कोटीच्या सुधारित खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याकरिता कार्यकारी समितीच्या मंजूरीसाठी सादर करण्यात आला. वाढीव कामाच्या व्याप्तीमुळे सदर प्रकल्पाचा कालावधी ९० दिवसांनी वाढविण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मंजूरीसाठी सादर करण्यात आला होता त्या प्रस्तावास मान्यता दिली.

...२१/-

१५.४ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ११११ :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्गावरील पॅकेज क्र.१ मधील किंग्ज सर्कल ते तुळपुळे चौक उड्डापुलाचे एकत्रिकरण करण्यास व तद्अनुषंगाने होणा-या रु.३० कोटीच्या अधिक खर्चासह रु.१४२ कोटी सुधारित खर्चास प्रशासकीय मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** सदर प्रकल्प पूर्ण करण्याचा कालावधी ९० दिवसांनी वाढविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

"**आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

त्यानंतर, मा.अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

——— oooooooooooo ———